-: प्रेसनोट :-

दि. २३/०३/२०२१

**फिर्यादी याच्या मित्राच्या घराचे अनधिकृत बांधकामावर बीएमसीकडून निष्कासन कारवाई न करण्याकरीता आरोपी क्र. १ याने फिर्यादीकडे रु. ७०,०००/– रक्कमेची मागणी करुन आरोपी क्र. २ याने रु. ७०,०००/– लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा नोंद.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | १८/२०२१ |
| कलम | ७ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | १) सुनिल बाबु मासोदे, वय २४ वर्षे, कनिष्ठ अभियंता (वर्ग–३), बृहन्मुंबई महानगर पालिका, एम पुर्व विभाग, गोवंडी, मुंबई ४३<br>२) अमर सुरेश तावे, वय ३४ वर्षे, कामगार (वर्ग–४), बृहन्मुंबई महानगर पालिका, एम पुर्व विभाग, गोवंडी, मुंबई ४३ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ७०,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ७०,०००/– |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी हे व्यवसायाने पत्रकार असून त्यांचे मित्राचा शिवाजीनगर, गोंवडी परिसरात घराचे बांधकाम करण्याचे कॉन्ट्रक्ट घेण्याचा व्यवसाय आहे. फिर्यादीचे मित्राने प्लॉट नं. ९/एल/५, रोड नं. १, शिवाजीनगर, गोंवडी, मुंबई ४३ येथे घर बांधकामाचे काम घेतलेले होते. सदर बांधकामाकरीता बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून परवानगी घेतली नसल्याने यातील आरोपी क्र. १ यानी फिर्यादीचे मित्रास महानगर पालिकेकडून नोटीस बजावली होती. त्याबाबत फिर्यादीचे मित्राने फिर्यादी यांना त्यांची महानगर पालिकेत ओळख असल्याने आरोपी क्र. १ यांना भेटण्यास सांगितले होते. त्यावेळी आरोपी क्र. १ याने फिर्यादी यांचेकडे सदर बांधकाम विनापरवाना करण्याकरीता व केलेल्या बांधकामावर निष्कासन कारवाई न करण्याकरीता रू. ७०,०००/– इतक्या लाचेची मागणी केलेली होती.<br>फिर्यादीस आरोपीत लोकसेवकास लाच दयावयाची नसल्याने फिर्यादीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे दि. १५/०३/२०२१ रोजी प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br>त्याअनुषंगाने दि.१७/०३/२०२१ रोजी फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन पडताळणी केली असता, यातील आरोपी लोकसेवक क्र. १ याने फिर्यादी यांचेकडे सदर घराच्या अनधिकृत बांधकाम करण्याकरीता व केलेल्या बांधकामावर महानगर पालिकेकडून निष्कासन कारवाई न करण्याकरीता फिर्यादीकडे रु.७०,०००/– इतक्या रक्कमेची लाच मागणी केल्याचे स्पष्ट झाले.<br>त्यावरुन दि. २३/०३/२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान आरोपीत लोकसेवक क्र. २ याने आरोपी क्र. १ यांचेवतीने रु. ७०,०००/– लाचेची रक्कम फिर्यादीकडून स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच आरोपी क्र. १ यांस देखील ताब्यात घेण्यात आले. |

२३।३।२१.

( हेमंत सावंत )
अपर पोलीस उप-आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०

संकेतस्थळ–acbmaharastra.gov.in

ईमेल– १) acbwebmail@mahapolice.gov.in

२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.

ऑनलाईन तकार अर्ज–www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क. १०६४

दुरध्वनीक. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००

Scanned with CamScanner